# धडा 19
# पाठ

## महाराष्ट्राचा सांस्कृतिक गोडवा

विट्ठल : विश्वदीप, तुझ्या आमंत्रणावरून मी मागच्या वर्षी आसाम फिरलो. यावर्षी तू महाराष्ट्रात चल. जर तू महाराष्ट्रात गेलास तर तुला खूप काही बघायला मिळेल. मी नाही का आसामात केवढं काही पाहिलं! ब्रह्मपुत्रेचं पात्र किती भव्य आहे! जसा काही समुद्रच! कामाख्यादेवीचं सुप्रसिद्ध मंदीरही पाहिलं. अजून काही दिवस आसामात घालवता आले असते तर आणखी छान वाटलं असतं. पण तरीही खूप मजा आली. आता तुझी पाळी-महाराष्ट्रात जायची.

विश्वदीप : अरे, मी मुंबईला आणि पुण्याला जाऊन चुकलो आहे.

विट्ठल : पण, महाराष्ट्र म्हणजे फक्त मुंबई आणि पुणं नाही. तुम्ही अन्य प्रांतातले लोक हीच चूक करता. मुंबई आणि पुणं पाहिलं तर तुम्हाला वाटतं सगळा महाराष्ट्र पाहिला. पण महाराष्ट्रात बघण्यासारखं आणखीही खूप आहे. संत्र्यांसाठी जगभरात प्रसिद्ध असलेलं नागपूर आहे, सुंदर आणि टिकाऊ चादरींसाठी प्रसिद्ध सोलापूर आहे, नांदेडचा गुरुद्वारा आहे आणि सिंधुदुर्गचा सागरी किल्लाही आहे.

विश्वदीप : मी यावर्षी जाऊ शकलो तर नक्की जाईन. पण तूही माझ्याबरोबर येऊ शकशील नं?

## महाराष्ट्र की सांस्कृतिक मिठास

विट्ठल : विश्वदीप, तुम्हारे आमंत्रण पर मैं पिछले साल असम घूमा। इस साल तुम महाराष्ट्र चलो। यदि तुम महाराष्ट्र गए तो तुम्हें काफी कुछ देखने को मिलेगा। मैंने नहीं असम में काफी कुछ देखा ब्रह्मपुत्र का पाट कितना विशाल है। जैसे कोई समुद्र ही (हो)। कामख्या देवी का प्रसिद्ध मंदिर भी देखा। यदि कुछ और दिन असम में बिताता तो और भी अच्छा लगता। पर फिर भी बहुत आनंद आया। अब महाराष्ट्र चलने की तुम्हारी बारी है।

विश्वदीप : अरे! मैं तो मुंबई और पुणे जा चुका हूँ।

विट्ठल : पर महाराष्ट्र का मतलब सिर्फ मुंबई या पुणे नहीं है। आप अन्य राज्यों के लोग यही गलती करते हैं। अगर आपने मुंबई और पुणे देखा तो समझते हो कि पूरा महाराष्ट्र देख लिया। महाराष्ट्र में देखने लायक और भी बहुत कुछ है। संतरे के लिए दुनिया भर में प्रसिद्ध नागपुर है, सुंदर और टिकाऊ चादरों के लिए प्रसिद्ध सोलापुर है। नांदेड़ का गुरुद्वारा और सिंधुदुर्ग का सागर स्थित किला भी है।

विश्वदीप : यदि मैं इस साल जा सका तो ज़रूर जाऊँगा। पर तुम भी मेरे साथ चल सकोगे न?

विट्ठल : मला जमलं तर मी नक्की येईन. पण मला जरी काही कारणामुळे येणं शक्य झालं नाही तरी तू नक्की जा.

विश्वदीप : असं कसं? तू आला नाहीस तर गंमत येणार नाही. पण समजा, तू जर येऊ शकणारच नसशील तर मला तिथल्या एखाद्या चांगल्या यात्रा कंपनीचा पत्ता देऊ शकशील का?

विट्ठल : अरे, का नाही देऊ शकणार? तू मला आसामच्या फिरतीच्या वेळी केवढी मदत केली होतीस. जर तू मला मदत केली नसतीस तर मी आयुष्यातल्या एका सुंदर अनुभवाला मुकलो असतो.

विश्वदीप : मग सांग महाराष्ट्रात केव्हा जाणं बरं पडेल?

विट्ठल : तू आता गेलास तर रत्नागिरीचा सुप्रसिद्ध हापूस आंबा खाऊ शकशील. भाद्रपदात गेलास तर महाराष्ट्रातला गणेशोत्सव तुला बघायला मिळेल. लोकमान्य टिळकांनी समाजप्रबोधना साठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला होता. तो त्यांनी सुरू केला नसता तर जनजागृती होऊ शकली नसती.

विश्वदीप : हो, ते खरं आहे. आणि आणखी एक सांगू का? मला माझ्या एक मित्रानं कळवलं आहे की, पुण्याला तर ईद आणि गणेशोत्सव दोन्हीही सगळे मिळून खूप उत्साहानं आणि एकोप्यानं साजरे करतात.

विट्ठल : हो. आणि तू तर मुंबईला पाहिलंच आहेस की, वांद्र्याच्या माऊंटमेरीच्या जत्रेत सगळ्या जातींचे आणि धर्मांचे लोक खूप उत्साहानं भाग घेतात.

विट्ठल : यदि संभव हुआ तो मैं ज़रूर चलूँगा। पर यदि मैं किसी कारण न चल सका तो भी तुम अवश्य जाना।

विश्वदीप : ऐसे कैसे? तुम नहीं चलोगे तो मज़ा नही आएगा। पर समझो, यदि तुम चल ही नहीं सके तो मुझे वहाँ की किसी अच्छी यात्रा - कंपनी का पता दे सकोगे क्या?

विट्ठल : अरे! क्यों नहीं दे सकूँगा? तुमने मेरे असम भ्रमण में मुझे कितनी मदद की थी! यदि तुमने मेरी मदद नहीं की होती तो मैं जीवन के एक बढ़िया अनुभव से वंचित रह जाता।

विश्वदीप : फिर बताओ महाराष्ट्र जाना कब ठीक रहेगा?

विट्ठल : तुम इस समय जाओगे तो रत्नागिरि का प्रसिद्ध हापुस आम खा सकोगे। यदि भादों के महीने में गए तो महाराष्ट्र का गणेशोत्सव तुम्हें देखने को मिलेगा। लोकमान्य तिलक ने समाज में जागृति के लिए सार्वजनिक गणेशोत्सव शुरु किया था। यदि उन्होंने यह नहीं शुरु किया होता तो जन जागृति नहीं हो सकती थी।

विश्वदीप : हाँ, यह तो सच है। एक बात और बताऊँ क्या? मुझे मेरे एक मित्र ने बताया है कि पुणे में तो ईद और गणेशोत्सव दोनों को ही सब मिलकर बड़े उत्साह से और भाईचारे से मनाते हैं।

विट्ठल : हाँ। और तुमने मुंबई में देखा ही है कि बांद्रा की माउंट-मेरी के मेले में सब जातियों के और धर्मों के लोग उत्साह से भाग लेते हैं।

विश्वदीप : बरं, काय रे, महाराष्ट्रात तुम्ही चैत्र शुद्ध प्रतिपदेला 'गुढीपाडवा' म्हणता आणि त्यादिवशी गुढी उभारून नवीन वर्षाचा प्रारंभ करता न?

विठ्ठल : हो हो, अगदी बरोबर! त्या दिवशी तू कुठल्याही मराठी माणसाच्या घरी गेलास तर तुला श्रीखंड हमखास मिळेल. आणि महाराष्ट्रातली दिवाळी पण छान असते हं! पूर्ण पाच दिवस! लाडू, चिवडा, चकल्या, सांजोऱ्या, करंज्या, अनारसे, शेव असे खाण्याचे अनेक प्रकार. फटाक्यांची सुंदर आतषबाजी आणि दिव्यांची आकर्षक रोषणाई जर पाहायची असेल तर तुला दिवाळीतच जायला हवं.

विश्वदीप : ध्वनी व वायू प्रदूषण कमी करायचं असेल तर मोठ्या आवाजाच्या आणि जास्त धूर सोडणाऱ्या फटाक्यांवर बंदी हवीच. आणि तशी ती सरकारने घातलीही आहे. तुला ठाऊक आहे न?

विठ्ठल : ते मात्र खरं आहे. दिवाळीनंतरचा महाराष्ट्रातला मोठा सण म्हणजे मकरसंक्रांत. त्यावेळी 'तिळगुळ' देतात आणि 'तिळगुळ घ्या, गोडगोड बोला' असं म्हणतात. परस्परसंबंधांतला कटुपणा विसरून स्नेह आणि गोडवा वाढविण्यासाठी तिळगुळ असतो. स्त्रिया त्यादिवशी हळदी कुंकवाचे आयोजन करतात.

विश्वदीप : महाराष्ट्रात होळी साजरी करत नाहीत का?

विश्वदीप : अच्छा, क्यों रे, आप महाराष्ट्र में चैत्र शुक्ल प्रतिपदा को गुड़ी पड़वाँ कहते हैं और उसी दिन 'गुड़ी' फहराकर नया साल प्रारंभ करते हैं न?

विठ्ठल : हाँ, हाँ, बिल्कुल ठीक। उस दिन यदि तुम किसी मराठी आदमी के घर गए तो तुम्हें श्रीखंड निश्चय ही मिलेगा। और महाराष्ट्र में दिवाली भी बढ़िया होती है। पूरे पाँच दिनों तक। लड्डू, चिवड़ा, चकली, मीठी रोटी, गुझिया, अनारसे, सेव आदि अनेक खाद्य पदार्थ (बनाए जाते है)। यदि पटाखों की सुंदर आतिशबाजी और दीपों की जगमगाहट देखनी हो तो तुम्हें दिवाली पर ही जाना चाहिए।

विश्वदीप : यदि ध्वनि और वायु प्रदूषण कम करना हो तो ज्यादा आवाज वाले और ज्यादा धुआँ छोड़ने वाले पटाकों पर प्रतिबंध लगाना ही चाहिए। सरकार ने ऐसा प्रतिबंध लगाया भी है। तुम्हें मालूम है न?

विठ्ठल : वह बाकी सच है। दिवाली कें बाद महाराष्ट्र का प्रमुख त्योहार है मकर-संक्रांति। उस समय 'तिल-गुड़' देते हैं और 'तिल-गुड़ लो, मीठा-मीठा बोलो', कहते हैं। आपसी संबंधो में कटुता भूलकर स्नेह और मिठास बढाने के लिए तिल-गुड़ होता है। स्त्रियाँ इस दिन हल्दी-कुमकुम का आयोजन करती हैं।

विश्वदीप : महाराष्ट्र में होली नहीं मनाते हैं क्या?

विठ्ठल : मनाते हैं न। पर हमारी होली उत्तर

विठ्ठल : करतात नं, पण आमची होळी उत्तर भारतांतल्या होळीपेक्षा थोडीशी वेगळी असते. होळीला पुरणाची पोळी असते. तू पुरणपोळी खाल्ली आहेस का?

विश्वदीप : हो. माझ्या दिल्लीतल्या एका मराठी मित्राकडे मी पुरणपोळीची चव घेऊन चुकलो आहे.

विठ्ठल : चल तर मग. महाराष्ट्रात जायच्या तयारीला सुरवात कर आणि तिथल्या पुरणपोळीची चव घे.

भारत की होली से थोड़ी सी भिन्न होती है। होली पर पूरन-पोली बनाते हैं। तुमने पूरन-पोली खाई है क्या?

विश्वदीप : हाँ, दिल्ली के एक मराठी मित्र के घर मैं पूरन-पोली का स्वाद ले चुका हूँ।

विठ्ठल : चलो फिर, महाराष्ट्र चलने की तैयारी शुरु करो और वहाँ की पूरन पोली का स्वाद लो।

शब्दार्थ

| | |
|---|---|
| आमंत्रण | निमंत्रण |
| बघायला मिळेल | देखने को मिलेगा |
| केव्हढं काही | काफी कुछ |
| भव्य | विशाल |
| जाऊन चुकलो | जा-चुका |
| चादर | चादर |
| येऊ शकणे | आ सकना |
| गंमत | मज़ा |
| फिरती | दौरा, भ्रमण |
| मुकलो असतो | वंचित हना |
| समाज प्रबोधन | सामाजिक जागृति |
| सार्वजनिक | सार्वजनिक |
| एकोप्यानं | मिलजुलकर |
| गुढीपाडवा | वर्ष प्रतिपदा, वर्ष का पहला दिन |
| गुढी | गुड़ी |
| हमखास | जरूर, निश्चय ही |
| करंज्या | गुझिया |
| बंदी | प्रतिबंध |
| वेगळी | अलग |
| चव | स्वाद |

## अभ्यास

I नीचे दिए गए प्रश्नों के उत्तर दीजिए।

1) विठ्ठलने आसाममध्ये कायकाय पाहिले?
2) महाराष्ट्रात पुण्यामुंबईशिवाय बघण्यासारखं कायकाय आहे?
3) भाद्रपदात महाराष्ट्रात कोणता उत्सव साजरा करतात?
4) सार्वजनिक गणेशोत्सव कोणी व का सुरू केला?
5) महाराष्ट्रात सणांच्या दिवशी केल्या जाणाऱ्या विविध खाद्यपदार्थांची नावे सांगा.
6) महाराष्ट्रातील दिवाळीबद्दल थोडक्यात माहिती सांगा.
7) 'गुढीपाडवा' कधी असतो? त्या दिवशी काय करतात?

II नीचे दिए गए वाक्यों में रेखांकित शब्दों के स्थान पर कोष्ठक में दिए गए शब्दों का प्रयोग कर दो-दो नये वाक्य बनाइए।

1) ब्रह्मपुत्रेचं पात्र किती भव्य आहे! (मोठे, विस्तीर्ण)
2) महाराष्ट्रात बघण्यासारखं आणखीही खूप आहे. (पाहण्यासारखं दाखवण्यासारखं)
3) लोकमान्य टिळकांनी समाजप्रबोधनासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. (जनजागृतीसाठी, एकात्मतेसाठी)
4) दिवाळीत फटाक्यांची आतषबाजी असते. (दिव्यांची रोषणाई, मजाच मजा)
5) प्रदूषण कमी करण्यासाठी मोठ्या आवाजाच्या फटाक्यांवर बंदी हवी. (जास्त धूर सोडणाऱ्या, प्रदूषण वाढविणाऱ्या)

III उपयुक्त अक्षर जोडकर दिए गए शब्द पूरे कीजिए।

1) आ ... ... णा ... रू ...
2) ... हा रा ... त
3) ब ... ण्या ... र ...
4) ... यु ... त ...
5) ग णे ... ... ...
6) मा ... ट ... री ...
7) गु ... पा ड ...
8) ... र ण ... ...
9) त ... ... ला

IV नीचे दिए गए शब्दों में से उन शब्दों का चयन कीजिए जो पाठ में आए हैं।

आसाम, पंजाब, महाराष्ट्र, ब्रह्मपुत्रा, मंदीर, पुणे, नाशिक, प्रसिद्ध, जर, गावात, मानवता, शिकवण, संत, ज्ञानेश्वर, तर, नामदेव, शकशील, मुकलो असतो,

हापूस आंबा, सफरचंद, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, गणेशोत्सव, दसरा, करंज्या, भेळ, चहा, चिवडा, आतषबाजी, प्रदूषण, घेऊन चुकलो आहे, आई, बाबा, जरी, तरी.

V प्रत्येक शब्द समूह में जो शब्द उस वर्ग का न हो उसे पहचानिए।

1) मुंबई, नागपूर, ब्रह्मपुत्र, सोलापूर, सिंधुदुर्ग.
2) दिवाळी, गुढीपाडवा, गणेशोत्सव, ईद, पुरणपोळी.
3) फटाके, सांजोऱ्या, करंज्या, अनारसे, चकल्या.
4) मराठी, मित्र, दिवाळी, पुरणपोळी, गुढी.
5) सुंदर, आकर्षक, जर, चांगली, सुप्रसिद्ध.

VI कोष्ठक में दिए गए शब्द से संबंधित शब्दों को बताइए।

1\. 1) कामख्यादेवी, सावली, गणपती, पाणी (मंदीर)
2) स्वच्छ, नांदेड, नागपूर, नवा, सोलापूर, सिंधदुर्ग (महाराष्ट्र)
3) दिवाळी, गुढीपाडवा, गणेशोत्सव, आंबा, ईद, फुल (दसरा)
4) लाडू, चकल्या, पाच, सांजोऱ्या, करंज्या, फटाके (अनारसे)
5) चिवडा, जाणे, शेव, दुपार, रोषणाई, आतषबाजी (दिवाळी)

VII नीचे दिए गए शब्दों के लिए इस पाठ में आए विशेषण शब्द कोष्ठक में दिए गए हैं। उन्हें उपयुक्त शब्दों के साथ जोड़िए।
पात्र, मंदीर, यात्राकंपनी, अनुभव, दिवाळी, रोषणाई
(सुंदर, आकर्षक, भव्य, चांगली, सुप्रसिद्ध, छान)

VIII उदाहरण के अनुसार दिए गए शब्दों को सही क्रम में रखकर वाक्य बनाइए।
*उदाहरण:* नाहीस, जर, गावाला, गेला, तू, माझ्याकडे, तर ये,
तू जर गावाला गेला नाहीस तर माझ्याकडे ये.

1) आला, जर, पहिला, पेढे, मी, तर, नंबर, माझा, वाटीन,
2) सुट्टी, जर, येईन, तर, शाळेला, मिळाली, तुमच्याकडे, मी,
3) बागेत, नाही, लवकर, जरी, तरी, घरी, आपण, तू, आलास, जाणार
4) विद्यार्थ्याने, अभ्यास, जर, परीक्षेत, नाही, नाही, उत्तम, मिळणार, यश, तर, केला, त्याला
5) पिकं, जर, पाऊस, येतील, चांगली, तर, पडला, भरपूर,

IX कोष्ठक में दिए गए हिंदी शब्दों के समानार्थक मराठी शब्दों का प्रयोग कर वाक्य पूरे कीजिए।

1) मी संपूर्ण महाराष्ट्र ......... . (देख चुका हूँ।)
2) तू माझ्याबरोबर ......... . (खेल सकोगे क्या?)

3) विजयने ताजमहाल पाहिला नसता तर तो जीवनातील एका सुंदर अनुभवाला ....... . (वंचित रह जाता।)
4) महाराष्ट्रात सगळे सण उत्साहाने ......... . (मनाते हैं।)
5) महाराष्ट्रात तू सागरी किल्लाही ........ . (देख सकोगे)

IX उदाहरण के अनुसार कोष्ठक में दिए गए शब्दों में से उपयुक्त शब्द चुनकर वाक्य पूरे कीजिए।

*उदाहरण:* तू हे काम करू......... . (शकेल, शकतील, शकतोस)
तू हे काम करू शकतोस.

1) मी यावर्षी गाण्याच्या क्लासला जाऊ ........ नाही. (शकणार, शकेल, शकतो)
2) राहुल, तुझा पुण्यातील पत्ता कळवू ......... काय? (शकते, शकतो, शकशील)
3) सायली आजारपणामुळे स्पर्धेत भाग घेऊ ........ नाही. (शकते, शकली, शकतील)
4) कष्ट केल्याशिवाय यश मिळू ........ नाही. (शकत, शकशील, शकतो)
5) द्वितीय भाषा शिकणारे विद्यार्थी व्याकरणात चुका करू ....... . (शकते, शकणार, शकतात)

X उदाहरण के अनुसार नीचे दिए गए वाक्यों के निषेधवाचक रूप बनाइए।

*उदाहरण:* जर तू आलास तर मी येईन.
जर तू आला नाहीस तर मी येणार नाही.

1) जर विद्यार्थ्याने अभ्यास केला तर तो उत्तीर्ण (पास) होईल.
2) प्रत्येकाने प्रयत्न केले तर यश मिळेल.
3) मुलांनी आईवडीलांचं ऐकलं तर त्यांचं कल्याण होईल.
4) जर आपण स्वच्छ राहिलो, तर आपले आरोग्य चांगले राहील.
5) जर मन पावन असेल, तर ईश्वराचे दर्शन होईल.

XI 'जर...तर', 'जरी...तरी' जैसे शर्तसूचक शब्दों का प्रयोग कर तीन-तीन नये वाक्य बनाइए।

XII उदाहरण के अनुसार दिए गए प्रत्येक वाक्य जोड़ी को मिलाकर एक-एक वाक्य बनाईए।

1. *उदाहरण:* तू येशील. मी येईन.
जर तू येशील तर मी येईन.

1) मी म्हैसूरमध्ये राहीन. मी वृंदावन गार्डन पाहीन.
2) मला बक्षिस मिळेल. मी सर्वांना पेढे देईन.

3) सर्वजण प्रयत्न करतील. ते काम लवकर होईल.

2. *उदाहरण:* ती गात आहे. तू ऐक.
जर ती गात असेल तर तू ऐक.
1) ती पुरणपोळी करते आहे. तू बासुंदी कर.
2) तो दूध आणतो आहे. तू चहा कर.
3) ते शेक्सपिअरवर लिहित आहेत. तू कालिदासावर लिही.

3. *उदाहरण:* तिला लिहायचं आहे. तिला लिहू दे.
जर तिला लिहायचं असेल तर तिला लिहू दे.
1) त्यांना नाटकात काम करायचं आहे. त्यांना नाटकात काम करू दे.
2) आता विजयला खेळायचं आहे. त्याला खेळू दे.
3) गीता आणि सुनीताला सहलीला जायचं आहे. त्यांना सहलीला जाऊ दे.

4. *उदाहरण:* तू खेळणार नाहीस. मी खेळणार नाही.
जर तू खेळणार नाहीस तर मी खेळणार नाही.
1) निलेश चित्रपटाला जाणार नाही. नितीनसुद्धा जाणार नाही.
2) तुम्ही ते काम करणार नाहीत. तोपण ते काम करणार नाही.
3) शिक्षक विद्यार्थ्यांना रागावणार नाहीत. विद्यार्थी अभ्यास करणार नाहीत.

5. *उदाहरण:* तू मला ते काम सांगितले नाही. मी ते काम केले नाही.
जर तू मला ते काम सांगितले असते तर मी ते केले असते.
1) तू मला बोलवले नाहीस. मी आलो नाही.
2) मी बाजारात गेलो नाही. मी फळे व भाजी आणली नाही.
3) ती 'नेट' ची परीक्षा उत्तीर्ण झाली नाही. ती प्राध्यापक झाली नाही.

पढिए और समझिए।

मराठी काव्याचं अध्ययन करायचं तर सुरवात ज्ञानेश्वरीपासून करायला हवी. ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानेश्वर हे जसे थोर कवी होते, तसेच ते महान् चिंतक पण होते. ज्ञानेश्वरीची काव्यात्मकता अजोड आहे. जर श्रेष्ठतेच्या आधारावर जगातल्या सगळ्या साहित्यकृतींची यादी करायचं ठरवलं, तर ज्ञानेश्वरीचं स्थान पहिल्या दहातच असेल.

ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत. त्यांनी तारुण्यात संन्यास घेतला होता. पण नंतर आपल्या गुरूंच्या आज्ञेवरून त्यांनी पुन्हा गृहस्थाश्रमात प्रवेश केला. त्यामुळे चिडलेल्या रुढीवाद्यांनी त्यांचा व त्यांच्या कुटुंबाचा खूप छळ केला. त्यांना वाळीत टाकलं. अखेर, विठ्ठलपंत व त्यांची पत्नी या दोघांनीही जलसमाधी घेतली. ज्ञानेश्वर व त्यांची भावंडं पोरकी झाली. ज्ञानेश्वर जरी या सगळ्या कटू अनुभवांतून गेले होते तरी त्यांनी अमृतासारख्या मधुर वाङ्मयाची निर्मिती केली. सर्वसामान्य वाचक इ

**ाानेश्वरीमधल्या गहन तत्त्वज्ञानाला समजू शकला नाही, तरी तिच्यातला रसाळपणा त्याच्या हृदयाला भिडतो.**

**शब्दार्थ**

| | |
|---|---|
| थोर | महान |
| काव्यात्मकता | कविता का भाव |
| अजोड | बेजोड़ |
| यादी | सूची बनाना |
| चिडलेल्या | चिढ़े हुए |
| रुढीवादी | रुढ़िवादी |
| छळ करणे | तकलीफ देना |
| वाळीत टाकणे | बहिष्कृत करना |
| पोरकी | अनाथ |
| रसाळपणा | कविता का रस |
| हृदयाला भिडणे | हृदय छू लेना |

**अभ्यास**

I नीचे दिए गए प्रश्नों के उत्तर मराठी में दीजिए।

1) ज्ञानेश्वरी कोणी लिहिली?
2) ज्ञानेश्वरांच्या वडिलांचं नाव काय होतं?
3) रुढीवाद्यांनी त्यांचा छळ का केला?
4) सर्वसामान्य माणसाला ज्ञानेश्वरीतलं गहन तत्त्वज्ञान समजलं नाही, तरी त्यांतलं काय आवडतं?
5) जगातल्या साहित्यकृतींची श्रेष्ठतेच्या आधारावर यादी करायचं ठरवलं तर काय होईल?

II उपयुक्त अक्षर जोडकर शब्द पूरे कीजिए।

1) अ ... य ...
2) ... ने श्व ... ... र्ते
3) गृ ह ... श्र ... त
4) रू ढी ... ... नी
5) वा ... म या ...

III नीचे दिए गए शब्दों में से पाठ (पढिए और समझिए) में आए शब्दों को पहचानिए और बताइए।

काव्याचं, कथेचं, अध्ययन, कवी, चिंतक, विठ्ठलपंत, शिक्षक, संन्यासधर्म बहिणी, पत्नी, तिखट, मधुर, उदारता, रसाळपणा, हृदयाला.

IV हिंदी में अनुवाद कीजिए।

दोन आक्टोबर हा दिवस संपूर्ण भारतात 'गांधी जयंती' म्हणून साजरा करतात. हा एक महत्त्वाचा राष्ट्रीय सण आहे. या दिवशी आमच्या शाळेत अनेक उत्तम कार्यक्रम साजरे करतात. त्याचा मी अनेकदा अनुभव घेऊन चुकलो आहे. गांधी जयंतीला सर्व विद्यार्थी व शिक्षक सभागृहात जमतात. व्यासपीठावर गांधीजींची प्रतिमा किंवा फोटो ठेवलेला असतो. त्याला प्रमुख पाहुणे व मुख्याध्यापक पुष्पहार व खादीची माळ अर्पण करतात. कार्यक्रमाची सुरूवात गांधीजींच्या 'वैष्णव जन तो तेणे कहिए' या प्रसिद्ध भजनाने होते. मराठीचे शिक्षक स्वागतपर भाषण करतात. त्यानंतर प्रमुख पाहुणे गांधीजींच्या विचारांवर व कार्यकर्तृत्वावर व्याख्यान देतात. जर आपण हे व्याख्यान ऐकले तर आपल्या ज्ञानात भर पडते. म्हणून सर्वजण हे व्याख्यान लक्षपूर्वक ऐकतात. काही विद्यार्थी प्रश्न विचारतात आणि प्रमुख पाहुणे त्याला उत्तरे देतात. या चर्चेनंतर विद्यार्थी आपले कार्यक्रम सादर करतात. देशभक्तीपर गीते, गांधीजींची भजने म्हणतात. गांधीजींच्या जीवनावरील प्रसंगांचे नाट्यरूपांतर सादर करतात. गांधीजींच्या व गांधीजींविषयीच्या ग्रंथांचे वाचन विद्यार्थी करतात. काही शिक्षक 'माझे सत्याचे प्रयोग' या गांधीजींच्या आत्मकथेचे वाचन करतात. जर विद्यार्थ्यांची इच्छा असेल तर ते सुद्धा गांधीजींबद्दल बोलू शकतात. मी देखील अनेकदा असे बोलून चुकलो आहे. यानंतर मुख्याध्यापक अध्यक्षीय भाषण करतात. यानिमित्ताने होणाऱ्या सूतकताईच्या स्पर्धेत मला अनेकदा पारितोषिकेही मिळाली आहेत. कार्यक्रमाच्या शेवटी हिंदीचे शिक्षक आभारप्रदर्शन करतात. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटतात. शेवटी सर्वजण राष्ट्रगीत म्हणतात. या दिवशी आपण जर गैरहजर राहिलो तर या सुंदर कार्यक्रमांपासून, व्याख्यानांपासून आपण वंचित राहातो. राष्ट्रपिता महात्मा गांधींनी सत्य व अहिंसा ही तत्त्वे सांगितली आहेत. त्यांनी दिलेला 'खेड्याकडे चला' हा संदेश आजही उपयुक्त आहे. गांधीजी साध्या सोप्या भाषेत खूप उच्च विचार व तत्त्वज्ञान मांडतात. जर आपण त्यांच्या तत्वांनुसार जगलो तर भारत जगाचे नेतृत्व करू शकेल.

V मराठी में अनुवाद कीजिए।

महाराष्ट्र में गणेशोत्सव बड़ी धूमधाम से मनाते है। यह पर्व भादों की शुक्ल चतुर्थी से लेकर चतुर्दशी तक मनाते है। दस दिनों तक हर जगह साहित्य, संगीत और सांस्कृतिक कार्यक्रमों की धूम होती है। गणेशजी की प्रतिमा विशेष रूप से तैयार किए गए पंडालों में रखते है। पंडालों को खूब सजाते हैं। झाँकियाँ देखने के लिए लोगों की भीड़ उमड़ती है। लोगों का उत्साह और उल्लास देखते ही बनता है। दस दिनों के

बाद प्रतिमाओं को विसर्जित करते हैं। सब ओर सुनाई पड़ता है - "गणपति बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या"।

VI अपने राज्य के किसी प्रसिद्ध त्योहार पर एक छोटा अनुच्छेद मराठी में लिखिए।

## टिप्पणियाँ

I इस पाठ में निम्नलिखित वाक्यप्रकारों का प्रयोग किया है।

1) जर तू महाराष्ट्रात गेलास, तर तुला खूप काही बघायला मिळेल.
यदि तुम महाराष्ट्र गए तो तुम्हें काफी कुछ देखने को मिलेगा।
2) मुंबई आणि पुणं पाहिलं तर तुम्हाला वाटतं सगळा महाराष्ट्र पाहिला.
यदि तुमने मुंबई और पुणे देख लिया तो तुम्हें लगता है कि तुमने पूरा महाराष्ट्र देख लिया।
3) मी यावर्षी जाऊ शकलो तर नक्की जाईन.
यदि मैं इस साल जा सका तो जरूर जाऊँगा।
4) तू आता गेलास तर रत्नागिरीचा सुप्रसिद्ध हापूस आंबा खाऊ शकशील.
यदि तुम इस समय तो रत्नगिरि का प्रसिद्ध हापुस आम खा सकोगे।
5) (तू) भाद्रपदात गेलास तर महाराष्ट्रातला गणेशोत्सव तुला बघायला मिळेल.
अगर तुम भादों के महीने में गए तो तुम्हें महाराष्ट्र का गणेशोत्सव देखने को मिलेगा।

उपर्युक्त वाक्यों में देखा जाता है कि मराठी में हिंदी के "यदि ...... तो" के प्रयोग वाले शर्तसूचक वाक्यों के लिए "जर ...... तर" इन अव्ययों का प्रयोग होता है। इस प्रयोग द्वारा एक वाक्यांश में क्रिया का घटना दूसरे वाक्यांश के क्रिया के घटने पर निर्भर होना व्यक्त किया जाता है।

ध्यान में रखिए कि कभी कभी वाक्यांश से "जर ....." का प्रयोग प्रत्यक्ष रूप से न हो कर, अनुस्यूत होता है।

II नीचे दिए गए वाक्यों को देखिए।

1) अजून काही दिवस आसामात घालवता आले असते तर आणखी छान वाटलं असतं.
यदि कुछ और दिन असम में बिताता तो और भी अच्छा लगता।
2) जर तू मला मदत केली नसतीस तर मी आयुष्यातल्या एका सुंदर अनुभवाला मुकलो असतो.
यदि तुमने मेरी मदद नहीं की होती तो मैं जीवन के एक बढ़िया अनुभव से वंचित रह जाता।

3) जर लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव सुरु केला नसता तर जनजागृती होऊ शकली नसती.
यदि लोकमान्य तिलक ने गणेशोत्सव नहीं शुरु किया होता तो जन जागृति नहीं हो सकती थी।

उपर्युक्त "हेतु हेतुमद-भूतकालिक" वाक्यों का, संबंध अनिवार्य रूप से भूतकाल से होता है तथा उन में प्रत्यक्ष में नही हुए, नही किए गए क्रियाकलापों के परिस्थितिओं का तथा उन के परिणाम/फलरूप क्रियाओं तथा परिस्थितिओं का जिक्र होता है।

III नीचे दिए हुए प्रयोगों पर ध्यान दीजिए।

1) मला जरी काही कारणामुळे येणं शक्य झालं नाही तरी तू नक्की जा.
यदि मैं किसी कारण न चल सका तो भी तुम अवश्य जाना।

2) जरी तू माझ्याकडे आलीस तरी मी तुला भेटणार नाही.
यदि तुम मेरे पास आई भी तो मैं तुम्हें नहीं मिलूँगी।

हिंदी के "यदि-तो भी" "यद्यपि -" "तथापि" जैसे प्रयोग वाले वाक्यों के समान इन वाक्यों में "जरी" - और "तरी" के द्वारा वाक्यांशों को जोडा जाता है। इन के द्वारा एक वाक्यांश में दिए गए क्रिया तथा परिस्थिति का और दूसरे में अनपेक्षित परिणाम का संकेत दिया जाता है।

IV नीचे दिए गए प्रयोगों पर ध्यान दीजिए।

1) मी यावर्षी जाऊ शकलो तर नक्की जाईन.
यदि मैं इस साल जा सका तो जरूर जाऊँगा।

2) तू ही माझ्याबरोबर येऊ शकशील नं?
तुम भी मेरे साथ चल सकोगे न?

3) पण मला काही कारणामुळे जाणं शक्य झालं नाही तरी तू जा.
यदि मैं किसी कारण न जा सका तो भी तुम अवश्य जाना।

4) समजा तू येऊ शकणारच नसशील तर मला तिथल्या एखाद्या चांगल्या यात्रा कंपनीचा पत्ता देऊ शकशील का?
समझो, यदि तुम चल ही न सके तो मुझे वहाँ की किसी अच्छी यात्रा-कंपनी का पता दे सकेंगे क्या?

5) तो (गणेशोत्सव) त्यांनी (लोकमान्य टिळकांनी) सुरू केला नसता तर जनजागृती होऊ शकली नसती.

यदि उन्होंने यह नहीं शुरु किया होता तो जन जागृति नहीं हो सकती थी।

इन वाक्यों में "शक" क्रिया रूप तथा उस से बने हुए कृदन्तशब्दरूपों का प्रयोग किया गया है। हिंदी के "सक" (सकना) अर्थ में इस का प्रयोग होता है।

क्रिया के मूलरूप मे 'ऊ' प्रत्यय लगाकर उस के बाद "शक" के निम्न लिखित रूपों का प्रयोग कर शक्यता बोधक वाक्य बनते हैं।

| | | *एकवचन* | *बहुवचन* |
|---|---|---|---|
| *उत्तमपुरुष* | *(पु.)* | मी जाऊ शकतो. | आम्ही/आपण जाऊ शकतो. |
| | *(स्त्री.)* | मी जाऊ शकते. | |
| *मध्यमपुरुष* | *(पु.)* | तू जाऊ शकतोस/शकतेस. | तुम्ही/आपण जाऊ शकता. |
| *अन्यपुरुष* | *(पु.)* | तो जाऊ शकतो. | ते जाऊ शकतात. |
| | *(स्त्री.)* | ती जाऊ शकते. | त्या जाऊ शकतात. |
| | *(नपुं.)* | ते जाऊ शकते. | ती जाऊ शकतात. |

*भूतकाल:*

| | | | |
|---|---|---|---|
| *उत्तमपुरुष* | | मी जाऊ शकलो/शकले. | आम्ही/आपण जाऊ शकलो. |
| *मध्यमपुरुष* | *(पु.)* | तू जाऊ शकलास. | तुम्ही/आपण जाऊ शकलात. |
| | *(स्त्री.)* | तू जाऊ शकली. | तू जाऊ शकलीस. |
| *अन्यपुरुष* | *(पु.)* | तो जाऊ शकलास. | ते जाऊ शकले. |
| | *(स्त्री.)* | ती जाऊ शकली. | त्या जाऊ शकल्या. |
| | *(नपुं.)* | ते जाऊ शकले. | ती जाऊ शकली. |

*भविष्यकाल:*

| | | |
|---|---|---|
| *उ.पु.* | मी जाऊ शकेन. | आम्ही/आपण जाऊ शकू. |
| *म.पु.* | तू जाऊ शकशील. | तुम्ही/आपण जाऊ शकाल. |
| *अ.पु.* | तो/ती/ते जाऊ शकेल. | ते/त्या/ती जाऊ शकतील. |

V नीचे दिए गए प्रयोगों पर ध्यान दीजिए।

1) अरे! मी मुंबईला आणि पुण्याला जाऊन चुकलो आहे.
   अरे! मैं तो मुंबई और पुणे जा चुका हूँ।
2) मी पुरणपोळीची चव घेऊन चुकलो आहे.
   मैं पूरन पोली का स्वाद ले चुका हूँ।

इन वाक्यों में हिंदी के "चुका (हूँ)" के अर्थ में 'चुक' क्रियारूप का प्रयोग किया गया है। "आहे" क्रियारूप के उपयुक्त प्रयोगों के साथ इस का प्रयोग पूर्ण भूतकाल यानि की किसी भी क्रिया के पूर्णतः हो जाने के अर्थ में किया जाता है। इस में पुरुषलिंगवचन वाचक प्रत्यय लगते हैं।

| *उदाहरण:* | | *एकवचन* | *बहुवचन* |
|---|---|---|---|
| *उत्तमपुरुष* | *(पु.)* | **मी हापूस आंब्याची चव घेऊन चुकलो आहे. मैं हापुस आम का स्वाद ले चुका हूँ.** | आम्ही/आपण हापूस आंब्याची चव घेऊन चुकलो आहोत. हम हापुस आम का स्वाद ले चुके हैं। |
| | *(स्त्री.)* | **मी हापूस आंब्याची चव घेऊन चुकले आहे. मैं हापुस आम का स्वाद ले चुकी हूँ।** | |
| *मध्यमपुरुष* | *(पु.)* | **तू हापूस आंब्याची चव घेऊन चुकला आहेस. तुम हापुस आम का स्वाद ले चुकेहो।** | तुम्ही/आपण हापूस आंब्याची चव घेऊन चुकला आहात. आप हापुस आम का स्वाद ले चुके हैं। |
| | *(स्त्री.)* | **तू हापूस आंब्याची चव घेऊन चुकली आहेस. तुम हापुस आम का स्वाद ले चुकी हो।** | |
| *अन्यपुरुष* | *(पु.)* | **तो हापूस आंब्याची चव चुकला आहे. वह हापुस आम का स्वाद ले चुका है।** | **ते हापूस आंब्याची चव घेऊन चुकले आहेत. वे हापुस आम का स्वाद ले चुके हैं।** |
| | *(स्त्री.)* | **ती हापूस आंब्याची चव घेऊन चुकली आहे. वह हापुस आम का स्वाद ले चुकी है।** | **त्या हापूस आंब्याची चव घेऊन चुकल्या आहेत. वे हापुस आम का स्वाद ले चुकी हैं।** |
| | *(नपुं.)* | **ते हापूस आंब्याची चव घेऊन चुकले आहे.** | **ती हापूस आंब्याची चव घेऊन चुकली आहेत.** |

**विशेष ध्यान दीजिए की "चुक" क्रियारूप का मराठी में दूसरा अर्थ भी है - "गलती करना" "भूल करना"।**

**VI** **हळदीकुंकू: 'हळदीकंकू' महाराष्ट्र की एक सांस्कृतिक परंपरा है। स्त्रियाँ मकरसंक्रांति जैसे पर्व पर सुहागनों को घर बुलाती हैं। उनके माथेपर 'हळदीकुंकू' (हल्दी और कुमकुम) लगाती हैं। अपने से उम्र में बड़ी सुहागनों के चरण छूती हैं। नारियल, सुपारी हल्दी-गाँठ, रूपया (पैसे), बादाम, खुरमा और चावल, गेहूँ या चना**

**आदि चीजें या इन में से कुछ चीजें सुहागन के पल्लू में डालती हैं। इसे 'ओटी भरणे' कहते हैं। इस 'हळदीकुंकू' की परंपरा के साथ-साथ जब कोई सुहागन घर आती है तब भी उसके माथेपर हल्दी-कुमकुम लगाकर उसे बिदा करते हैं।**